**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर, पशुसंवर्धन आयुक्तालयाशेजारी,
औंध, पुणे-४११००७
दुरध्वनी क्र.०२०-३५०० ०४५०
Email ID-admin@mahaurja.com Website- http://www.mahaurja.com

## जाहिरात

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),औंध, पुणे कार्यालयात विधी अधिकारी या पदावर सेवा करार पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता महाऊर्जाच्या https://www.mahaurja.com या वेबसाईटवर जाहिराती सोबत दिलेल्या अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या विधी अधिकारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/(भाग-१)/१३, दि.०८/०९/२०२३ मधील तरतुदीनुसार देय होणारे मासिक पारिश्रमिक मानधन रु.३०,०००/- व दुरध्वनी व प्रवास खर्च रु.५,०००/- अशी एकुण रु.३५,०००/- याप्रमाणे ठोक रक्कम अदा करण्यात येईल. शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी होणारे बदल यासाठी लागू राहतील.

| पदाचे नाव व विवक्षित कामाचे स्वरुप | संख्या | आवश्यक अर्हता | अनुभव | वय | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| **विधी अधिकारी**<br>१. महाऊर्जा कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.<br>२. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.<br>३. महाऊर्जा कार्यालयाच्या सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर "नोडल ऑफिसर" म्हणून काम पहाणे.<br>४. विधी विषयक कामकाजा बाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे. | ०१ | उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल. | १. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहिल.<br>२. विधी अधिकाऱ्यास मा. मुंबई उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग (MERC), मा. वीज अपिलीय न्यायाधिकरण (APTEL), मा. भारताचे सर्वोच्च न्यायालय तसेच इतर संबंधित न्यायालये व न्यायसदृश मंचांपुढील नवीन व नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील प्रकरणे हाताळण्याचा व्यापक अनुभव असावा.<br>३. तसेच नवीकरणीय ऊर्जा कायदे व त्यासंबंधित कायदेशीर प्रक्रिया, वादग्रस्त प्रकरणे, नियामक अनुपालन आणि धोरणात्मक स्पष्टीकरण यामध्ये प्रविणता असणे आवश्यक आहे.<br>४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल. | विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल. | महाऊर्जा मुख्यालय, पुणे |

**सुचना :-**

उपरोक्त अर्हता धारण करीत असलेल्या विधी अधिकाऱ्यांनी महाऊर्जाच्या वेबसाईटवर Vacancies या शिर्षकाखाली सेवा करार पध्दतीने विधी अधिकारी या पदाकरिता जाहिरातीत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात "विधी अधिकारी" या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दि.१९/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ वा. ते सायं.६.१५ वा.) पर्यंत महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, (महाऊर्जा) औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,पशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी, औंध, पुणे-४११ ००७ येथे हार्ड कॉपीमध्ये आवक नोंदणी विभागात सादर करावेत. दि.१९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वा. नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

ठिकाण : पुणे
दि.०१/०५/२०२५

स्वाक्षरीत/-
महाव्यवस्थापक (प्रशासन), महाऊर्जा पुणे

## महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

## विधी अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने अर्ज सादर करावयाच्या अटी व शर्ती

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), औंध, पुणे कार्यालयाअंतर्गत विधी अधिकारी यांस सेवा करार पध्दतीने घेणेसाठी अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/ १३, दि.१७/१२/२०१६, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/ १३, दि.२१/०२/२०१८ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००(भाग १)/ १३, दि.०८/०९/२०२३ यास अधीन राहून करण्यात येईल.

२. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती ११ महिन्याकरिता असेल. परंतु अशी नियुक्तीस आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता नुतनीकरण करता येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

३. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांस विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळेत नियुक्त अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुतलेली नसावी.

५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्र /माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता बाळगणे आवश्यक राहील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

८. नियुक्त अधिकारी यांचे कामकाजाबाबत सक्षम असलेल्या प्राधिकारी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

९. उमेदवारांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक नंतर कळविण्यात येईल.

१०. उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

११. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. सदर व्यक्तीने महाऊर्जाकडे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.सदर बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच शासनाचे / महाऊर्जाचे

नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार येणार नाही हे नमुद करावे.

१२. नियुक्ती कालावधीत प्रचलित शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमीक, भत्ते व प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. विधी अधिकारी या पदाच्या कामाकरिता विधी अधिकाऱ्यांनी महाऊर्जाच्या वेबसाईटवर Vacancies या शिर्षकाखाली सेवा करार पध्दतीने प्रशासन अधिकारी या पदासाठी जाहिरातीत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात “विधी अधिकारी” या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दि.१९/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ वा. ते सायं.६.१५ वा.) पर्यंत महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, (महाऊर्जा) औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,पशुसंवर्धन आयुक्तालया शेजारी, औंध, पुणे-४११ ००७ येथे हार्ड कॉपी आवक नोंदणी विभागात सादर करावी. दि.१९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वा. नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अन्य पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)**
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर, पशुसंवर्धन आयुक्तालयाशेजारी,
औंध, पुणे-४११००७
दुरध्वनी क्र.०२०-३५०० ०४५०
Email ID - admin@mahaurja.com Website- http://www.mahaurja.com

जाहिरात क्र. २०२५/महाऊर्जा/प्रशासन/०२ दि.०१/०५/२०२५

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र. १००/ १३, दि.१७/१२/२०१६ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/(भाग-१)/१३, दि. ०८/०९/२०२३ मधील अटि व शर्तीच्या अधीन राहून महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),औंध, पुणे कार्यालया अंतर्गत विधी अधिकारी या पदाकरिता सेवाकरार पद्धतीने घेण्याबाबत अर्जाचा नमुना, आवश्यक अनुभव, वयोमर्यादा, कामाचे स्वरुप व अन्य अटी व शर्ती महाऊर्जा कार्यालयाच्या https://www.mahaurja.com संकेतस्थळावर Vacancies या शिर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहे. तरी अर्हता प्राप्त इच्छुकांनी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज व त्यासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे महाऊर्जा, पुणे यांचे वर नमूद पत्त्यावर समक्ष दि.१९/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ वा. ते सायं.६.१५ वा.) पर्यंत सादर करावेत. तद्नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त अर्जांचे प्राथमिक पडताळणीनंतर अर्हताधारक अर्जदारांची मुळ प्रमाणपत्र / कागदपत्राची पडताळणी व मुलाखत इत्यादी बाबत अर्जदाराचे अर्जात नमूद ई-मेलवर कळविण्यात येईल.

ठिकाण : पुणे
दि. ०१/०५/२०२५

स्वाक्षरीत/-
महाव्यवस्थापक (प्रशासन), महाऊर्जा पुणे

**सेवाकरार पध्दतीवर "विधी अधिकारी" या पदाकरीता अर्जाचा नमुना**

| |
|---|
| **अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र** |

**१. अर्जदाराचे नाव :**

**२. शैक्षणिक अर्हता :**

**३. अर्जदाराचा पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक :**

**४. जन्म दिनांक व वय :**

**प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमुद माहिती / तपशील हा बरोबर असून त्यामध्ये काही चुकीची माहिती आढळून आल्यास त्यास मी जबाबदार राहील व त्यासाठी माझी नेमणूक रद्द होण्यास पात्र राहील.**

ठिकाण : पुणे

दिनांक :   /   /    अर्जदाराची स्वाक्षरी

---

**अर्जा सोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे (इयत्ता १० वी / १२ वी / पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र)

२. अर्जदाराचे अनुभव प्रमाणपत्र

३. **स्वंयघोषणा पत्र** -
**महाऊर्जाच्या कोणत्याही प्रकल्प / विभागाच्या विधी प्रकरणांमध्ये गुंतलेले हितसंबंध** (Conflict of Interesst) **नसल्याबाबतचे स्वंयघोषणा पत्र**.